॥ श्री ॥

# श्री त्र्यंबुली देव्यै नमः

श्री विष्णूंच्या नाभी कमळांतून ब्रह्मदेव उत्पन्न होऊन त्यांनी विष्णूंच्या आज्ञेने सृष्टी निर्माण करण्यास प्रारंभ केला. आपल्या तमोगुणाने त्यांनी गय, लवण, कोल्ह असे तीन मानसपुत्र निर्माण केले. त्यापैकी गयासुराने ब्रह्मदेवाची आराधना करून ब्रह्मदेव प्रसन्न झाल्यावर त्यांचेकडे असा वर मागीतला की देव, पितर व तिर्थ यापेक्षा माझ्या देहात जास्त पवित्रता असावी.'

ब्रह्मदेवानी त्यास हा वर दिल्यामुळे अगणिक लोक त्याच्या देहाच्या स्पर्शाने मुक्त झाले, त्यामुळे यमपुरी ओस पडली. नंतर देवानी युक्तीने गयासुरास विनंती करून यज्ञाकरिता त्याचा देह मागीतला. गयासुराने तो दिल्यावर त्याला उपडा घालून त्याच्या शरीरावर यज्ञ करण्यास सुरुवात केली व गयासुराच्या इच्छेने चंद्रसुर्य असेपर्यंत त्याच्या शरीरावर वास करू लागले.

लवणासुरास देवानी आपल्या बंधुस युक्तीने फसविल्याचे समजल्यावर त्याने नारद मुनीच्या चिथावणीवरून त्रैलोक्याचे राज्य काबीज केले व तो सर्व देवाना त्रास देऊ लागला. नंतर सर्व देवाच्या विनंतीवरून श्री विष्णूनी लवणासुराचा वध केला व त्याच्या इच्छेने, तो मरण पावला त्या ठिकाणी गया व विष्णू दोघांच्या नावाचे विष्णूगया नावाचे तीर्थ निर्माण केले जेथे स्नान व दान करणाऱ्यास मुक्ती मिळू लागली.

लवणासुराच्या वधाचा वृत्तांत कळताच कोल्हासुरास अत्यंत कोप आला व देवाचा सुड घेण्याकरिता सिद्धी प्राप्त करण्यासाठी ब्रह्मदेवाची आराधना करू लागला. ब्रह्मदेव प्रसन्न झाल्यावर त्याने असा वर मागीतला की तुम्ही निर्माण केलेल्या सर्व सुरअसुरापासून मी अमर व्हावे, मला पृथ्वीचे सर्व राज्य द्यावे व माझ्या वज्रासारख्या देहास शस्त्रास्त्रापासून इजा होऊ नये.

'ब्रह्मदेवानी त्याची मागणी मान्य करून त्यास सांगीतले गाई, ब्राह्मण व देव यांचा व्देष सोडून हरीचरणी लीन होशील तर या वराची सिद्धी होईल.तू कोल्हापूरात जा व तेथे राज्य कर. कोल्हापूरात त्यावेळी सुकेशी नावाचा राक्षस राज्य करीत होता. कोल्हासूराने युद्धात त्याचा पराभव केला. देवानी त्याचेवर पुष्पवृष्टी करून त्याचा राज्याभिषेक केला. ब्रह्मदेवाने उपदेश केल्याप्रमाणे गाई, ब्राह्मण आणि देव यांचा व्देष सोडून कोल्हासूर उत्तमरितीने

राज्य कारभार करू लागला.

कोल्हासूरास करवीर, विशाळ, लज्ज्ञासूर व कुलांधक असे चार पुत्र झाले. कोल्हासूर आपला थोरला पुत्र करवीर यास गादीवर बसवून मुक्ती मिळविण्याच्या हेतूने वनवासात तप करण्याकरिता गेला. करवीर आपल्या तिघा बंधूसह राज्य करू लागला. परंतु आपले चुलते गयासुर व लवणासुर यांना देवानी मारल्याचे ऐकून त्यास त्वेष आला. त्याने देवां-ब्राह्मणांना उपद्रव देण्यास सुरवात केली. यज्ञशाला वगैरे मोडून टाकल्या. पुढे देव व मुनी यांच्या विनंतीवरून ब्रह्मा, विष्णू, महेश करवीराचे पारीपत्य करण्यासकरिता आले. करवीरांचे तिन्ही बंधु युद्धात मारले गेले. हे समजल्यावर क्रोध आलेला करवीर स्वत: युद्धास आला. घनघोर युद्धानंतर शंकरानी त्याचा वध केला व त्याच्या इच्छेस्तव या क्षेत्रास चंद्र सुर्य असेपर्यंत तुझे नाव राहील असा वर दिला.

आपले दोन्ही भाऊ यापूर्वीच देवांच्याकडून युक्ती प्रयुक्तीने कामी आले आहेत व त्यातच आता देवांच्यामुळे आपल्या पुत्रांचा युद्धात वध झाल्याचे समजल्यावर कोल्हासूरास खूप कोप उत्पन्न झाला. याचकरिता देवांचा सुड उगवल्याशिवाय रहाणार नाही, देवास महालक्ष्मीचा(अंबाबाई) आधार आहे त्याकरिता मी तप करून प्रथम श्रीला जिंकतो व नंतर देवांचे पारिपत्य करीन अशा विचारांने कोल्हासूराने तप करून श्री महालक्ष्मीस(अंबाबाई) प्रसन्न करून घेतले. महालक्ष्मीने वर मागून घे असे म्हटल्यांवर त्याने वर मागीतला की हे महालक्ष्मी ! तू करवीर सोडून शंभर वर्षे बाहेर जावे व हे राज्य मला द्यावे तसेच सर्व देवांवर मला विजय प्राप्त करता यावा यावर महालक्ष्मीने(अंबाबाई) 'तथास्तू'असे म्हटले व ती करवीरातून हिमालय पर्वतावर निघून गेली.

शंभर वर्षानंतर महालक्ष्मीने कोल्हासूराचा वध केला त्यावेळी कोल्हासूराने देवीस विनंती केली की माझी जगात किर्ती होण्याकरिता या क्षेत्रास कोल्हापूर नाव द्यावे व प्रतीवर्षी कुष्मांड फळ माझ्या नावे फोडावे. ती विनंती देवीने मान्य केली व प्रतीवर्षी कोल्हासूराच्या प्रतिकात्मक शिराचा भेद म्हणून कुष्मांड भेद सुरू झाला. कोल्हासूराचा वध झाला तेंव्हा त्याची पत्नी गरोदर होती ती पाताळामध्ये आपली कन्या कराळी म्हणून होती तिच्याकडे जावून राहीली. तेथे तिला मुलगा झाला. तिने तो आपल्या कन्येस दत्तक दिला व त्याचे नाव कामाक्ष ठेवीले.

कौंडीण्य नावाचे ऋषी होते सत्यवती असे त्यांच्या पत्नीचे नाव असून ती साध्वी महापतीव्रता होती. एकेदिवशी दुपारी ऋषी दमून आले म्हणून

विश्रांती घेत होते व पत्नी त्यांचे पाय मर्दन करीत होती. त्यांना निद्रा लागली. इतक्यात एक भिक्षुक आला. त्यास भिक्षा घालण्यास पादसेवन सोडून ती गेली व अतिथीचे पुजन करून त्यास भिक्षा दिली. इतक्यात ऋषी जागे झाले. आपली सेवा सोडून पत्नी गेल्याचे पाहून त्यांना क्रोध आला व त्यांनी तिला तू दासी होशील' असा शाप दिला. पत्नीने नंतर खरा प्रकार सांगितला तुम्ही निद्रीस्त असता आश्रयास आलेल्या पित्यासम अतिथीची पुजा केली. यात माझा काय अपराध झाला ? तरी तुम्ही उशा:प देऊन मजवर कृपा करावी व माझे रक्षण करावे तिची ही प्रार्थना ऐकून मुनी बोलले 'हे कांते, तुझा अपराध नाही, हे मला आता समजून आले आहे परंतु माझा शाप कदापी खोटा होणार नाही करिता उत्तम वंशात जन्म पावून तू श्री महालक्ष्मीची दासी' होशील व तुझ्या सदाचरणाने देवांवर उपकार करून तू देवतापद प्राप्त करशील व श्री महालक्ष्मीच्या अगदी निकटची होशिल.' हाच उशा:प समज.

मंगल क्षेत्रामध्ये भार्गव नावाचा एक सदाचरणसंपन्न ब्राह्मण राहत असे. त्याच्या पत्नीचे नाव होते विशालाक्षी. तिला प्रत्येक वर्षी कन्या होत असे व पाचवे दिवशी मरण पावत असे. म्हणून उभयता पतीपत्नी अत्यंत दुःखी होते. त्यांनी संकल्प केला की एखादी कन्या जर जिवंत राहीली तर आम्ही ती श्री महालक्ष्मीस अर्पण करू. त्यानंतर विशालाक्षी गरोदर राहीली व तिच्या गर्भात पतीने शाप दिलेली सत्यवती प्रवेशली. जसा गर्भ वाढू लागला तशी शोभा वाढत चालली. घरामध्ये धनधान्याची समृध्दी झाली. सातवे मासी विशालाक्षी प्रसूत होऊन तिला तेजपुंज चर्तुभुज कन्यारत्न झाले. कालांतराने भार्गव नवस फेडण्याकरीता कन्येस घेऊन मंगवाद्यासह कोल्हापूरास आला, कन्येस श्री स अर्पण करून श्रीच्या आज्ञेने तेथील यात्रा करून श्रींचा वरप्रसाद घेऊन आनंदाने परत आपल्या घरी गेला.

कन्या करवीरात राहून दिवसेंदिवस वाढू लागली. ती त्रिकाल स्नान करून श्रीची पूजाअर्चा, देवळातील सडासंमार्जन करून रांगोळ्या घालणे वगैरे दास्यत्वाची कामे ती मोठ्या भक्तीने करीत असे.

करवीरात मल्लालय तीर्थात सुवर्णकमळे होती. ती रक्षण करण्यास रक्षक ठेवले होते. परंतु त्याना न समजता पाताळातील दैत्य ती पळवून नेत असत. श्री ने त्या कमळांच्या रक्षणाचे काम या कुमारी दासीकडे सोपवले. ती कमळाचे रक्षण उत्तम प्रकारे करीत होती. त्यामुळे गगनमार्गे पुष्कळ दैत्य येऊ लागले. त्यांचा वध त्या चर्तुभुज कुमारीने केला. हे पाहून दैत्य पाताळातून गुप्तरुपाने येऊन कमळे चोरुन नेऊ लागले. हे समजताच त्या कुमारी दासीने

पाण्यात बुडून या कमळे चोरणाऱ्या दैत्यांचा नाश केला. यामुळे महालक्ष्मी संतुष्ट होऊन तिला म्हणाली की, 'तुझ्यामुळे कमळांची चोरी बंद झाली. गुप्तरुपाने येणारे दैत्य मारुन माझ्या सुवर्ण कमळांचे रक्षण केलेस. माझ्या सेवेस तू नेहमीच तत्पर असतेस याकरिता तू मला अत्यंत प्रिय आहेस. तू त्रिकाली अंबु(पाणी) मध्ये बुडी मारलीस म्हणून त्र्यंबुली नावाने तू प्रख्यात होशील.'

सुवर्ण कमळाचे रक्षण करीत असता त्र्यंबुलीने असंख्य दैत्यांचा व कामाक्षाच्या दत्तक वडीलांचा वध केला होता. कामाक्ष मोठा झाला आणि त्याला ही हकीकत समजल्यावर तो त्वेषाने अपार सैन्य मिळवून पाताळातून वर आला व आकाशमार्गाने त्रिभुवनास त्रास देऊ लागला. इंद्रादीकाची सर्व स्थाने हरण करून कोल्हापूरशिवाय सर्व त्रैलाक्याचे राज्य जिंकले. सर्व देव कोल्हापूरास पळून गेले. त्यांचा पाठलाग करत कामाक्षदैत्य कोल्हापूरास आला. त्याने कोल्हापूरची अभेद्य सुरक्षा व्यवस्था पाहिली. तरीसुध्दा युध्दाची तयारी केली. इकडे देवानीही युध्दाची तयारी केली. कामाक्ष व महालक्ष्मी यांचा नेतृत्वामध्ये दैत्य व देव याच्यात तुंबळ युध्द झाले. आपल्या अपार सामर्थ्याने देवीने सागराप्रमाणे पसरलेल्या दैत्यसेनेचा संहार केला. उर्वरीत सेनेसह कामाक्ष पाताळात पळून गेला. विजयी महालक्ष्मीने मंगलवाद्यासह नगरीत प्रवेश केला.

पाताळी पळून गेलेल्या कामाक्षाच्या मनात देवीच्या आश्रयाने देवानी त्यास जिंकल्यामुळे क्रोध उत्पन्न झाला.

इतक्यात तेथे दैत्यगुरु शुक्राचार्याचे आगमन झाले. त्यांना आसन देऊन त्यांची पुजा करून कामाक्षाने त्यांना सर्व वृत्तांत सांगितला व महालक्ष्मीसह सर्व देवावर विजय प्राप्त करण्याचा उपाय सांगण्याची विनंती केली. त्यावर शुक्राचार्य म्हणजे की, 'देव अमृतपानाने अमर झाले आहेत, त्यांचा नाश होणे शक्य नाही. तथापि तुला उपाय सांगतो तो ऐक, कपीलमुनीने तप करून माझ्यापाशी योगदंड मागितला त्याचा प्रभाव असा आहे की तो उजवा फिरविला असता देवासहित सर्व प्राणी शेळ्यामेंढ्या होतात व डावा फिरविला असता पूर्वरुपी होतात. यासाठी तू कपीलाची सेवा करून तो दंड संपादन कर व देवास शेळ्यामेंढ्या करून तुझ्या बहिणीस मला बोलावण्यास पाठव. मी येऊन तुला लांडग्याचे रुप देईन व तू लांडगा होऊन शेळ्यामेंढ्यारुपी देवाचे भक्षण कर म्हणजे तुझा कार्यभाग साधेल व तू त्रैलाक्याचा राजा होशील.'

कामाक्ष दैत्य आपल्या भगिनीसह कपिल मुनींकडे गेला व त्यांची सेवा

करण्याची इच्छा व्यक्त केली. कपिलमुनींच्या आज्ञेने त्याने आपल्या भगिनीसह अत्यंत एकनिष्ठ सेवा केली. त्या सेवेने प्रसन्न होऊन कपिलमुनींनी त्यास वर मागण्यास सांगितले. कामाक्षाने अत्यंत नम्रपणे 'मला योगदंड द्यावा' अशी विनंती केली. ही मागणी कपिलमुनीस वज्राघाताप्रमाणे भासली. आपल्याकडे योगदंड आहे ही माहिती कामाक्षास कशी लागली, त्याला योगदंड द्यावा- की न द्यावा असा विचार ते करू लागले. परंतु वचनबध्द असल्यामुळे त्यांनी अत्यंत कष्टाने योगदंड कामाक्षाला दिला व सांगितले की हा दंड उजवा फिरविला की सर्व प्राणीमात्र शेळ्यामेंढ्या होतील व डावा फिरविला की पूर्वरुपात येतील. हा दंड जर जमिनीवर ठेवला तर निसत्व होईल. तो दंड घेऊन कामाक्ष गेला व सर्व देवगण एकत्र कधी येतात त्याची वाट पाहू लागला.

इतक्यात सर्व देव कुष्मांड भेदाकरीता करवीरात जमले. ही संधी साधून कामाक्षाने आपल्या भगिनी व सैन्यासह करवीरास वेढा दिला. हे समजताच देवीने दैत्याबरोबर युध्द करण्यास आपले सैन्य पाठविले. यावेळी त्र्यंबुली कुष्मांड भेदनाच्या यात्रेकरीता साहित्य जमविण्यासाठी बाहेरगावी फिरत होती. तिने सर्व साहित्य सेवकामार्फत देवीकडे पाठविले. परंतु दैत्यसेनेने सेवकास मध्येच लुटले. यास्तव देवीने त्र्यंबुलीस निरोप पाठविला की, इकडील अन्नधान्याचा साठा व इतर साहित्याचा साठा संपत आला आहे व कुष्मांड भेदाकरीता सर्व देव येथे जमले आहेत. तरी साहित्य जरुर पाठविणे. श्री चा निरोप पोहोचल्यावर श्री त्र्यंबुलीने कुबेरपुत्र मणिग्रिवाकडे जाऊन त्याचे दास्य पत्करले व सर्व साहित्याचा आकाशमार्गे पुरवठा केला. हे पाहून देवादिकांस आनंद झाला व ते कुष्मांडभेदाच्या तयारीला लागले. तेवढ्यात दैत्यानी क्षेत्राचा एक तट पाडला व आत येऊ लागले. त्यामुळे कुष्मांडभेदाचे कार्य बाजूला ठेऊन देवगण युध्दास निघाले. याठिकाणी देव व दैत्यांचे घनघोर युध्द झाले. युध्द सुरु असताना सर्व देव एकत्र झालेले पाहून योगदंड घेऊन कामाक्ष आकाशात उंच उडाला व योगदंड उजवा फिरवून सर्व देवांना शेळ्यामेंढ्या बनविले. हा चमत्कार पाहून कामाक्ष व रक्ताला फार आनंद झाला. ते दोघे शेळ्यामेंढ्याचे दूध काढून व त्यापासून दही, ताक, तूप वगैरे करून यथेच्छ प्राशन करू लागले व राहिलेले साठवून ठेऊ लागले. ती ठीकाणे म्हणजेच दुग्धतीर्थ(दुधाळी), तक्रतीर्थ(टाकाळे) वगैरे प्रसिध्द आहेत. असे बरेच दिवस त्यांनी दुग्धपान करीत आनंदाने व्यतित केले.

देव शेळ्यामेंढ्या झाल्याचे वर्तमान नारदामार्फत त्र्यंबुलीस समजल्यावर तिच्या विनंतीवरुन मणीग्रीवाने तिला देवांच्या मुक्तीसाठी

जाण्याची आज्ञा दिली. मणिग्रिवाची आज्ञा घेऊन त्र्यंबुली करवीरास आली व कामाक्षास मारण्याची संधी शोधू लागली.

सर्वकाळ बहिणीबरोबर राहून दंडाचे रक्षण करीत असल्यामुळे त्र्यंबुलीस कामाक्ष वधाची संधी मिळेना. परंतु एके रात्री कामाक्ष आपल्या बहिणीस म्हणला की, 'आता आपण दुधदुभते खाऊन तृप्त झालो आहोत. आता तू शुक्राचार्याकडे जा व त्यांना घेऊन ये, म्हणजे संजीवनीच्या रुपाने सर्व दैत्य पुन्हा उठतील व आपण सर्वजण लांडग्याच्या रुपाने सर्व देवांचे भक्षण करू व निर्भयपणे करवीरावर राज्य करू.' रक्ता शुक्राचार्यांकडे जाण्यास निघाली असता वाटेत त्र्यंबुलीने तिला गाठले व तिचे केस धरुन फिरवून भूमीवर आपटून तिचा वध केला.

ती मेल्यावर त्र्यंबुली वृध्द दासीचे रुप घेऊन कामाक्षाकडे गेली व आपण शुक्राचार्यांची विश्वासू दासी असल्याचे व त्याना यज्ञासाठी रानशेणीची आवश्यकता असल्याचे सांगितले. त्यासाठी तुझ्याकडे पाठविले आहे. तरी तू रानशेणी माझ्याकडे द्याव्यास म्हणजे मी त्या घेऊन जाईन अशी विनंती केली.

यावर कामाक्षाने येथे मिळतील त्या शेणी शोधून घेऊन जाण्यास आपली हरकत नसल्याचे सांगितले. नंतर हात, पाय, मान कांपवित चोहोकडे फिरून शेणीचा शोध घेऊ लागली. काही अंतरावर जाऊन तिने आपल्या हाऱ्यात मोठेमोठे दगडधोंडे भरले व वरती थोड्या फार शेणी भरल्या व हारा उचलू लागली. परंतु तिला तो हारा उचलेना. ति कामाक्षाला बोलावून हारा उचलण्यास मदत करण्याची विनंती केली. कामाक्षाने एका हाताने हारा उचलण्याचा प्रयत्न केला. परंतु तो उचलेना. पुन्हा तिने गोड गोड बोलून दोन्ही हातानी हारा उचलण्यास मदत करण्याची विनंती केली. कामाक्षास योगदंड जमिनीवर ठेवता येत नसल्यामुळे मस्तकावर बांधला व दोन्ही हातानी हारा उचलण्यास मदत करू लागला. तो हारा उचलून तिच्या मस्तकावर ठेवण्यार इतक्यात तिने आपल्या हातानी तो हारा त्याच्या उरावर ढकलला. दैत्य त्या हाऱ्याच्या भाराने खाली पडला. इतक्यात चपळाईने तिने त्याच्या मस्तकावरील दंड काढून घेतला व त्याला पायाने रगडून ठार केले. त्याठिकाणी रक्ततीर्थ तयार झाले.

नंतर त्र्यंबुलीने दंड डावा फिरवून सर्व देवगणास मूळ स्वरुपात आणले. यामुळे सर्व देवास अतिशय आनंद झाला. नंतर महालक्ष्मीने सिंहासनावर बसून प्रतिवार्षिक कुष्मांडभेद करण्यास देवास आज्ञा केली. या देव मंडळीत त्र्यंबुली कोठे दिसली नाही म्हणून महालक्ष्मीने तिला सत्वर शोधून

आणण्यास सांगितले. इंद्रादी सर्व देव तिच्या शोधार्थ निघाले तेव्हा ती पूर्वेस एका कोसावर टेकडीवर क्षेत्राकडे पाठ करून बसली होती. सर्व देवांनी तिला महालक्ष्मी कुष्मांडभेदन करण्याकरता तुझी वाट पहात आहे तरी लवकर चलावे अशी विनंती केली. त्यावर त्र्यंबुली क्रोधाने म्हणाली की, तुम्ही सर्व देव मोठे कृतघ्न आहात. महालक्ष्मी आपल्या कार्यात दक्ष आहे, माझ्या हातून जे कार्य व्हायचे ते झाले आता तिला माझी गरज नाही, माझ्याशिवाय कोणतेही काम खोळंबत नाही. माझा प्रथम अपमान करून आता तुम्ही मला बोलविता परंतु प्राण गेला तरी मी तिकडे येणार नाही. हे समजल्यावर महालक्ष्मी स्वत: त्र्यंबुलीकडे गेली व तिला प्रेमाने अलिंगन देऊन हनुवटी धरून म्हणाली की, 'त्र्यंबुली तुझ्याशिवाय प्रिय अशी मला दुसरी सखी नाही,
माझ्यावर रागावू नकोस, तू देवास देवपण आणलेस, मी संतुष्ट झाले आहे. तुला पाहिजे तो वर माग.' यावर त्र्यंबुली बोलली की, 'कुष्मांडभेद जो दरवर्षी मुक्तीमंडपात करतात तो येथून पुढे या ठिकाणी माझ्यासमोर करावा. त्याकरिता तू देवगणासह येथे यात्रेस यावेस.' देवीने तिला तो वर दिला व बोलली की, 'करवीर क्षेत्रास जे लोक तीर्थयात्रेस येतील त्यांनी तुझे दर्शन न घेतल्यास त्याच्या यात्रेचे पुण्य तुला मिळेल व त्यांची यात्रा निष्फळ होईल. सर्व देवदेवतामध्ये तुला श्रेष्ठ मानले जाईल. अश्विन शुध्द पंचमीला नगरवासियांनी येथे येऊन तुझे दर्शन घेतल्यास त्याजवरील अरीष्टे टळतील.' याप्रमाणे वर देऊन महालक्ष्मीने स्वत: कात्यायनीसह त्र्यंबुलीचे पूजन करून मंगलवाद्ये वाजवून तिच्यापुढे कुष्मांडभेद केला व आनंदाने करवीरास परतली. नंतर इंद्रादी सर्व देवांनी त्र्यंबुलीची स्तुती करून व पुजा करून जयजयकार केला.

त्र्यंबुली पुढे बोलली की ज्या राक्षसाने सर्व देवांना शेळ्यामेंढ्या केले तो माझ्या पायातळात लोळत आहे, त्याची सर्व कुळे शेळ्यामेंढ्यारुपाने कल्पांतपर्यंत उत्पन्न होईल व खाण्याकरीता व बलीदानाकरीता त्यांचा वध केला जाईल. यावर सर्व देव संतुष्ट झाले. तेव्हा त्र्यंबुली प्रसन्न होऊन देवास म्हणाली हे माझे चरीत्र जे श्रवण किंवा पठण करतील व अश्विन शुध्द पंचमीस माझे दर्शन घेऊन स्तवन करतील त्यास सर्वसिध्दी प्राप्त होतील.

संकलन– प्रदिप गुरव
(श्री त्र्यंबुलीदेवी पुजारी)
संदर्भ– करवीर महात्म्य